# क्विक हिल तर्फे रुग्णवाहिका दान

**पुणे**
**जनप्रवास प्रतिनिधी**

भारतातील ग्रामीण भागातील आरोग्य सेवा वाढवण्याच्या सामाजिक उपक्रमाचा भाग म्हणून, क्विक हिल फाउंडेशन या क्विक हिल टेक्नोलॉजीजच्या सीएसआर शाखेने, पनवेल येथील आरएसएस जनकल्याण समितीसाठी त्यांच्या 'आरोग्य यान'उपक्रमाअंतर्गत, क्विक हिलने रायगड जिल्ह्यातील आदिवासी लोकांना चांगल्या आरोग्य सेवापुरवण्याकरिता अगदी नवी ॲम्ब्युलन्स दान केली. आरएसएस जनकल्याण समिती या भागातील वंचित लोकांकरिता आरोग्य सेवा पुरवते तसेच नियमित आरोग्य तपासणीच्या योजना राबवते. क्विक हिल टेक्नोलॉजीजचे एमडी आणि सीईओ श्री कैलाश काटकर, क्विक हिलच्या सीएसआर ॲक्टिव्हिटी आणि आरोग्य यानाम ागील प्रणेत्या सौ अनुपमा काटकर आणि श्री विठ्ठल डाके (डेप्यु. कमिशनरप पनवेल पीएमसी), श्री धैर्यशील जाधव (असिस्टंट कमिशनर पनवेल पीएमसी), आरएसएस जनकल्याण समिती, महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष डॉ. रवींद्र साताळकर आणि उपाध्यक्ष श्री विनायक दंभीर यांच्या उपस्थितीत या दानाचा कार्यक्रम पार पडला.

क्विक हिलचे अत्याधुनिक 'आरोग्य यान' रायगड जिल्ह्यातील आदिवासी भागातील लोकांना सेवा देईल. अति दुर्गम भागातील डॉक्टर आणि रुग्णांना प्रवासाकरिता ही उपयुक्त ठरेल. तसेच रायगड जिल्ह्यातील आदिवासी लोकांना नियमित तपासणी, निदान आणि उपचार यांसारख्या आरोग्य सेवा पुरवल्या जातील.